दैनिक दिव्य मराठी
औरंगाबाद, बुधवार, २९ जून २०१६ | २

# 'स्पर्धेत मराठवाड्यातील विद्यार्थी टिकण्यासाठी सीबीसीएस पद्धत'

**परभणी** | उच्च शिक्षण क्षेत्रात मराठवाड्यातील विद्यार्थी यशस्वी होण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने सीबीसीएस (क्रेडिट बेस चॉइस सिस्टिम) प्रणाली स्वीकारण्याचे निश्चित केले आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. विद्यासागर पंडित यांनी येथे दिली.

शिवाजी महाविद्यालयातील आयक्यूएसी विभागाच्या वतीने सीबीसीएस या विषयावर एकदिवसीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. विद्यासागर बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या स्थानिक नियामक मंडळाचे प्रमुख हेमंतराव जामकर होते. विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. जी. एन. शिंदे, विद्यापीठ व महाविद्यालय विकास संचालक डॉ. डी. बी. पानसरकर, सदस्य संजय नखाते, केशव दुधाटे, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव आदींची प्रमुख उपस्थिती होती.

सकाळ
नांदेड, बुधवार, २९ जून २०१६
४
TODAY परभणी



# विद्यापीठाने 'सीबीसीएस' प्रणाली स्वीकारली : कुलगुरू

**परभणी, ता. २८ (बातमीदार)** : उच्च शिक्षण क्षेत्रात मराठवाड्यातील विद्यार्थी यशस्वी होण्यासाठी विद्यापीठाने सी.बी.सी.एस प्रणाली स्वीकरण्याचे निश्चित केले आहे, अशी माहिती स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विद्यासागर पंडित यांनी दिली.

श्री शिवाजी महाविदयालयातील आय.क्यू.ए.सी विभागाच्या वतीने सी.बी.सी.एस या विषयांवर सोमवारी (ता.२७) एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी कुलगुरू डॉ. पंडित बोलत होते. अध्यक्षस्थानी स्थानिक नियामक मंडळ प्रमुख हेमंत जामकर, प्रभारी कुलगुरू डॉ.जी.एन.शिंदे, विद्यापीठ व महाविद्यालय विकास संचालक डॉ.डी. बी. पानसकर, संजय नखाते, केशव दुधाटे, प्राचार्य बाळासाहेब जाधव आदी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशेट्टी, डॉ. विजया नांदापूरकर, डॉ. रोहिदास नितोडे, विजय मोरे, प्रा. रविशंकर झिंगरे, प्रा. सराफ, डॉ. जयंत बोबडे, डॉ. प्रकाश लोखंडे, प्रा. मंजीरी भाटे, आदींनी पुढाकार घेतला.



**परभणी : येथील श्री शिवाजी महाविदयालयातील एक दिवसीय चर्चासत्राचे उद्‌घाटन कुलगुरू डॉ. विद्यासागर पंडित यांच्या हस्ते झाले.**

लोकमत औरंगाबाद बुधवार, दि. २९ जून २०१६ ४

# स्पर्धेत टिकण्यासाठी सीबीसीएस पद्धत

## चर्चासत्र : विद्यासागर पंडीत यांचे प्रतिपादन

**परभणी** : उच्च शिक्षण क्षेत्रात मराठवाड्यातील विद्यार्थी यशस्वी होण्यासाठी विद्यापीठाने क्रेडीट बेस चॉईस सिस्टीम प्रणाली (सीबीसीएस) प्रणाली स्वीकारण्याचे निश्चित केले असल्याचे प्रतिपादन स्वारातीम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विद्यासागर पंडीत यांनी केले.

येथील शिवाजी महाविद्यालयाच्या आयक्युएसी विभागाच्या वतीने सीबीसीएस या विषयावर २८ जून रोजी एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन केले होते. याप्रसंगी उद्घाटक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी स्थानिक नियामक मंडळाचे प्रमुख हेंमतराव जामकर, प्रभारी कुलगुरू डॉ. जी. एन. शिंदे, विद्यापीठ व महाविद्यालय विकास संचालक डॉ. डी. बी. पानसकर, संजय नखाते, केशव दुधाटे, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव आदींची उपस्थिती होती.

डॉ. विद्यासागर म्हणाले, विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाला या प्रणालीमुळे नवी उभारी मिळेल, युजीसीने दिलेल्या नियमानुसार ही प्रणाली स्वीकारली आहे, पुणे विद्यापीठानंतर स्वारातीम विद्यापीठ ही प्रणाली स्वीकारत आहे. या प्रणालीमुळेच आपले विद्यार्थी जागतिक स्तरावर जाऊ शकतात, असे ते म्हणाले. चर्चासत्राच्या दुसऱ्या सत्रामध्ये प्रभारी कुलगुरु डॉ. शिंदे, डॉ. अजय टेंगसे, डॉ. प्रशांत वक्ते, डॉ. रविंद्र देशमुख, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांनीही मार्गदर्शन केले.

यशस्वीतेसाठी उपप्राचार्य डॉ.श्रीनिवास केशेट्टी, डॉ. विजया नांदापूरकर, डॉ. रोहिदास नितोंडे, विजय मोरे, प्रा. रवीशंकर झिंगरे, प्रा. पी.पी. सराफ, डॉ. संजय बोब्डे, डॉ. प्रकाश लोखंडे, प्रा. मंजरी भाटे, आर. बी. टेकाळे आदींनी परिश्रम घेतले. (प्रतिनिधी)

परभणी RDX
Read Daily Exclusive
देशोन्नती परभणी/ बुधवार, दि. २९ जून २०१६

# मराठवाड्यातील विद्यार्थ्यांसाठी सीबीसीएस प्रणाली - डॉ. पंडित

शहर प्रतिनिधी / २८ जून

**परभणी :** उच्च शिक्षण क्षेत्रात मराठवाड्यातील विद्यार्थी यशस्वी होण्यासाठी विद्यापीठाने सी.बी.सी.एस. (क्रेडीट बेस चॉईस सिस्टम) प्रणाली स्वीकारण्याचे निश्चीत केले आहे. असे प्रतिपादन स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठांचे कुलगुरू डॉ. विद्यासागर पंडित यांनी केले.

श्री.शिवाजी महाविद्यालयातील आय.क्यु.एस.सी. विभागाच्या वतिने सी.बी.सी.एस. या विषयावर एक दिवसीय चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी उदघाटक म्हणुन कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर, कुलगुरू डॉ.जी.एस.शिंदे विद्यापीठ व महाविद्यालय विकास संचालक डॉ. डी. बी. पानसकर, कार्यक्रमाचे अध्यक्ष स्था. नि. मंडळाचे प्रमुख हेमंतराव जामकर सदस्य संजय नखाते, केशवअण्णा दूधाटे, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. उदघाटकीय भाषणात कुलगुरू डॉ. विद्यासागर म्हणाले की, सीबीसीएस मुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाला नवी उभारी मिळेल. या प्रणालीमुळे जागतिक स्तरावर आपले विद्यार्थी जावू शकतात. युजीसीने दिलेल्या नियमावली नुसार ही प्रणाली स्वीकारली आहे. पुणे विद्यापीठानंतर स्वा.रा.ती.म. विद्यापीठ ही प्रणाली स्वीकारत आहे असेही कुलगुरूंनी सांगीतले. या चर्चा सत्राच्या दुसऱ्या सत्रामध्ये प्रकुलगुरू डॉ.शिंदे, कला शाखेचे अधिष्ठाता डॉ. अजय टेंगसे, विज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत वक्ते, वाणिज्य शाखेचे अधिष्ठाता डॉ. रविंद्र देशमुख आदी तंज्ञानी सीबीसीएस विषयी सविस्तर माहिती सांगीतली. प्राचार्य डॉ. डॉ. बाळासाहेब जाधव यांनी प्रस्ताविक केले. उदघाटक व वृक्षारोपन महाविद्यालयाच्या परिसरामध्ये उभारण्यात आलेल्या उपहारगृहाचे उदद्याटन कुलगुरू डॉ. पंडीत यांच्या हस्ते करण्यात व मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपउप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशेट्टी, डॉ.विजया नांदापुरकर चर्चा सत्राचे संयोजक डॉ. रोहिदास नितोंडे, संयोजन सचिव तथा प्रबंधक विजय मोरे, प्रा. रविशंकर झिंगरे, प्रा. पी. पी. सराफ, डॉ. जयंत बोबडे, डॉ. प्रकाश आदींनी परिश्रम घेतले.

तुमच्या भावनांना शब्द देणारी
- देशोन्नती




**परभणी :** श्री शिवाजी महाविद्यालयात आयोजित स्वारातीम विद्यापीठाच्यावतीने आयोजित सीबीसीएस प्रणाली मार्गदर्शन कार्यशाळेचे उद्‌घाटन करताना कुलगुरु डॉ. विद्यासागर पंडित, समवेत हेमंतराव जामकर, प्राचार्य बी.यु. जाधव व दजर.

मुस्लिम बांधव या महिन्यात सलग ३० दिवस रोजा ठेवून विविध धार्मिक विधी पार पडतात. म्हणून पवित्र रमजान महिन्याचे औचित्य साधून चिमुकलेही जीवनातील प्रथम रोज्याची सुरूवात करतात याचेच एक ज्वलंत उदाहरण म्हणजे कुरेशी मोहल्यात वास्तव्य करणाऱ्या ६ वर्षीय शेख अनंस जाविद कुरेशी या चिमुकल्याने जीवनातील प्रथम रोजा ठेवून रोज्यांची सुरुवात केल्याने त्याचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.